**सरकारतर्फे सा.क्र.२**

**शपथेवर**

माझे नांव : भरत दत्तु कोकाटे,

वय : ४८ वर्ष, धंदा : शेती,

राहणार : कांगोणी, ता. नेवासा, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** -

१. फिर्यादी प्रल्हाद ठोंबळ हा माझ्या साडुचा मुलगा आहे. घटनेच्या वेळी माझ्या मालकीची प्लॅटीना मोटारसायकल क्र. एम एच १७ सी क्यु १६०४ ही होती. ती मोटारसायकल मी स्वत: वापरत होतो. माझा अपघात दि. १०/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०६.४५ च्या दरम्यान कांगोणी गावाच्या शिवारात रौंदळ वस्तीच्या चौकावर झाला होता. सदर दिवशी मी व माझ्या साडुचा मुलगा असे बजाज प्लॅटीना कंपनीची मोटारसायकल एम एच १७ सी क्यु १६०४ वरून घोडेगावरून येत होतो. सदर मोटारसायकल प्रल्हाद चालवत होता व मी त्याच्या मागे बसलो होतो. सदर दिवशी रौंदळ वस्तीकडुन एक ट्रॅक्टर जोरात येउन डिव्हायडच्या जवळ थांबला त्यामुळे आमची मोटारसायकल ट्रॅक्टरच्या जुगाडाला जाउन आदळली. सदर ट्रॅक्टर निळया रंगाचा विना नंबरचा होता. आमची मोटारसायकल जुगाडाला आदळल्यामुळे मी उडुन खाली पडलो व प्रल्हाद देखील खाली पडला. सदर अपघातामुळे मला जोरदार लागले होते व चक्कर आली नाही. सदर अपघातात माझा उजवा पाय गुडघ्याच्या खाली फ्रॅक्चर झाला होता, छातीला मार लागुन फ्रॅक्चर झाले हेते तसेच मुक्का मार देखील लागला होता. त्यानंतर प्रल्हादने फोनकरून त्याच्या वडीलांना बोलावुन घेतले. त्यांनी मला अ.नगर येथील मॅककेअर हॉस्पीटलमध्ये नेले होते. मॅककेअर हॉस्पीटलमध्ये मी साधारण: ६ दिवस आय सी यु मध्ये होतो. त्यानंतर छातीचा ईलाज होउन २९ एप्रिलला मला डिस्चार्ज मिळाला. अपघात हा बाळासाहेब देवगिरेच्या चुकीमुळे झाला होता. त्यांनी ट्रॅक्टर हा अचानक रस्त्यावर येउन थांबविल्यामुळे अपघात झाला होता. बाळासाहेब देवगिरे यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात उपस्थित आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एस. एस. सकट यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. माझे शिक्षण दहावी पर्यंत झालेले आहे. माझे मुळ गाव कांगोणी आहे. मला वडील नाहीत व बहिणींची लग्न झालेली आहे. माझा भाउ वेगळा राहतो. माझी आई माझ्या भावासोबत राहते.

३. मी साधारण: पाच ते साडे पाचच्या सुमारास घोडेगाव येथे गेलो होतो. घ ोडेगाव येथे साधारण: आम्ही अर्धा ते पाउन तास थांबलो होते. घोडेगावला आम्ही व्यापा-यांकडे गायी पाहण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, धोडेगाव येथे शुक्रवारी जनावरांचा मोठा बाजार असतो. हे म्हणणे खरे आहे की, घोडेगावच्या बाजारात शुक्रवारी जनावरे खरेदी करण्यासाठी वेगवेगळया राज्यातुन लोकं येतात. हे म्हणणे खरे आहे की, शुक्रवारच्या बाजारात जास्त प्रमाणात जनावरे पाहण्यास मिळतात. आम्ही सव्वा सहा ते साडे सहाच्या आसपास घोडेगाव वरून निघालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, अ. नगर ते औरंगाबाद हायवेवर वाहनांची भरपुर वर्दळ असते. प्रल्हाद त्याची मोटारसायकल ५० ते ५५ च्या स्पिडने चालवत होता. रौंदळ वस्तीकडे जाणा-या रोडवरून कांगोणी गावात जाता येते. हे म्हणणे खरे नाही की, प्रल्हादला रौंदळ वस्तीकडुन जाणा-या रोडने कांगोणी गावात जायचे होते.हे म्हणणे खरे नाही की, प्रल्हादला तो रस्ता लक्षात न आल्यामुळे त्याने अचानक मोटारसायकलचा ब्रेक लावला. हे म्हणणे खरे नाही की, प्रल्हादने अचानक मोटारसायकला ब्रेक लावल्यामुळे आम्ही खाली पडलो व आम्हाला दुखापती झाल्या. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टर चालवणा-या व्यक्तीचे नाव गाव व तो कोण होता हे आम्हाला अपघात घडला त्यावेळी माहिती नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला अपघाताच्या वेळेस पाहिले नव्हते.ट्रॅक्टरला अपघाताच्या वेळी छत (हुड) होते. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टरला असलेल्या छतामुळे (हुड) ट्रॅक्टर कोण चालवते हे विरूद्ध दिशेला असल्यास दिसु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे तो ट्रॅक्टर रस्ता ओलांडत होता व आम्ही मोटारसायकवरून रस्त्यावरून सरळ येत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा अपघात माझ्या साडुच्या मुलाकडुन मोटारसायकल कंट्रोल न झाल्यामुळे झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, निळया रंगाच्या ट्रॅक्टर ड्रायव्हरची अपघातामध्ये चुक नव्हती.हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टरने आम्हाला धडक दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही

की, मी सरतपासामध्ये खोटे नमुद केलेले आहे.हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष दिलेली आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

स्वाक्षरीत/-

दि. २३/०३/२०२६

**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा